। न हि ज्ञानेनं सदृशं पवित्रमिह विद्यते ।

Chh. Shivaji Shikshan Mendal Vaduj

# Arts & Commerce College, Vaduj



Department of Geography

## LABORATORY CERTIFICATE

This is to certify that

Shri / Kum ........ patole Rajashri Bhimrao ........

Has satisfactorily carried out the requirement practical work / field work / Execuision tour / Village Survey prescribed the

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**

For the B.A. Part III Course in GEOGRAPHY. This Journal represents his / her bonafide work in the year 2018 - 2019

**Exam Seat No.** [ ]

**Roll NO.** [ 607 ]

**Teacher incharge**

**Head**
**Department of Geography**
**Arts & Comm. College, Vaduj**

Scanned with CamScanner

Rajdhani
DATE / /

# अनुक्रमणिका


| अ. नं | तपशील | पान नं. |
|---|---|---|
| 1) | ऋण निर्देश | 1 |
| 2) | प्रस्तावना | 2 |
| 3) | क्षेत्रीय अभ्यासाची गरज | 3 |
| 4) | मौजे लोणी गाव निवडण्यापाठीमागची कारणे | 4 |
| 5) | मौजे लोणी गाव निवडण्यापाठीमागचे उद्देश | 5 |
| 6) | क्षेत्रीय अभ्यास पद्धती | 6 |
| 7) | वसाहतीचे भौगोलिक स्थान | 7 |
| 8) | ऐतिहासिक पार्श्वभूमी | 9 |
| 9) | वसाहती वैशिष्ट्ये | 10 |
| 10) | वसाहतीच्या विकासावर परिणाम करणारे घटक | 11 |
| 11) | वसाहतीची कार्ये | 17 |
| 12) | वसाहतीची अंतर्गत रचना | 20 |
| 13) | भूमी उपयोजन अ) भूमी उपयोजनाची संकल्पना<br>ब) भूमी उपयोजनावर परिणाम करणारे घटक | 21 |
| 14) | भूमी उपयोजन हेक्टरमध्ये | 22 |
| 15) | पिक निहाय लागवडीखालील क्षेत्र | 24 |
| 16 | समस्या | 27 |
| 17) | उपाययोजना | 29 |


MGcole

Scanned with CamScanner

Rajdhani
DATE / /

# • ऋणनिर्देश •

शिवाजी विद्यापीठाच्या भूगोलशास्त्र पदवी पेपर क्र. 14 मध्ये क्षेत्रीय अभ्यासासाठी ग्रामसर्वेक्षणाचा समावेश करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना ग्रामसर्वेक्षणातुन वसाहतीवर असलेल्या नैसर्गीक, आर्थिक, सांस्कृतीक, घटकांचा प्रभाव वसाहतीतील विविध समस्या वसाहतीमध्ये केले जाणारे विविध व्यवसाय तसेच नैसर्गीक किंवा कृत्रीम आपत्तींचा वसाहतीवरील प्रभाव लक्षात घेण्यासाठी अभ्यासक्रमामध्ये ग्रामसर्वेक्षणाचा समावेश केला आहे. आमच्या महाविद्यालयातील भूगोलशास्त्र विभागाने ग्रामसर्वेक्षण पुर्ततेसाठी मौजे लोणी ता. खटाव. जि. सातारा, या गावची निवड करून मंगळवार दिनांक 08/01/2019 रोजी अहवाल पुर्ण करण्याचा प्रयत्न केला. हा अहवाल पूर्ण करण्यासाठी आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. जी. जाधव सर यांनी परवानगी दिल्याबद्दल भूगोलशास्त्र विभाग त्यांचा ऋणी आहे. त्याचबरोबर आम्हांला प्रा. एस. सी. गाडे सर यांनी मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांचे ही आम्ही ऋणी आहोत. तसेच मौजे लोणी गावचे सरपंच सौ. रुक्मीणी श्रीमंत, शिंदे. आणि ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक व तलाठी, ग्रामस्थ, प्राथमिक, माध्यमिक, शाळेचे मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका, यांनीही आम्हांला आवश्यक माहिती उपलब्ध करून दिली. त्याबद्दल त्यांचे ऋणी आहोत.

Scanned with CamScanner

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने भूगोलशास्त्र या विषयाच्या अभ्यासक्रमाअंतर्गत क्षेत्रीय अभ्यासाला विशेष दर्जा दिला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाने क्षेत्रीय अभ्यासाची गरज व महत्व लक्षात घेऊन बी. ए. भाग ३ भूगोलशास्त्र या विषयाच्या पेपर क्र. १५ अभ्यासक्रमामध्ये सहलवृत्तांत व ग्रामसर्वेक्षणाच्या समावेश केला आहे. विद्यार्थ्यांमध्ये क्षेत्रीय अभ्यासाची आवड व निरीक्षण अभ्यासाद्वारे विविध घटकांचे आकलन करून त्यांचे विश्लेषण करण्याची क्षमता विद्यार्थ्यांत वाढावी या करिता क्षेत्रीय अभ्यासाचा समावेश केला आहे.

क्षेत्रीय अभ्यासातून वेगवेगळ्या प्रदेशातील भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक घटकांच्या अध्ययनाला विशेष महत्व आहे. ग्रामसर्वेक्षणाच्या माध्यमातुन महाविद्यालयाच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही एका ग्रामीण खेड्याची निवड करून त्या ग्रामीण खेड्यातील निवड करून त्या ग्रामीण खेड्यातील नैसर्गिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतीक अशा कोणत्याही एका समस्येची निवड करून तिचे अध्ययन ग्राम सर्वेक्षणाच्या माध्यमातुन पूर्ण करण्याचा निर्णय विद्यापीठाने लक्षात घेऊन त्याचा समावेश केला आहे.

Scanned with CamScanner

# क्षेत्रिय अभ्यासाची गरज

भूविस्थानाचे / भूगोलशास्त्राचे अध्ययन / आकलन करीत असताना विद्यार्थ्यांना वर्गामध्ये संदर्भग्रंथ, क्रमीक पुस्तके यांच्या माध्यमातुन प्रादेशिक, भौगोलीक घटकांची माहिती प्रादेशिक, आर्थिक, घटकांची माहिती, प्रादेशिक, धार्मिक व सांस्कृतीक घटकांची माहिती लक्षात होणे खूप कठीण होते. त्यापेक्षा त्या घटकांचे निरीक्षण करून आकलन केल्यास त्यांचे विश्लेषण करणे सहज सोपे जाते. त्यामुळे भूविज्ञात / भूगोलशास्त्रात क्षेत्रीय अभ्यासाची खूप गरज / महत्व आहे. आपल्या सभोवतालच्या परिसरात / प्रदेशात जाऊन नैसर्गीक, अर्थिक, सामाजीक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतीक घटकांचा सखोल असा अभ्यास करता येतो. एवढेच नव्हे तर क्षेत्रीय अभ्यासामध्ये एखाद्या प्रदेशामध्ये भेट दिली असता त्या प्रदेशातील लोक जीवनामध्ये त्यांच्या सामाजिक, अर्थिक, सांस्कृतीक जीवनाचे प्रत्यक्षात आकलन होते. म्हणुनच स्थानिक / प्रादेशिक आकलनात क्षेत्रीय अभ्यासाची खूप गरज असते. हे लक्षात घेवूनच विद्यापीठाने अभ्यासक्रमांअंतर्गत क्षेत्रीय अभ्यासाचा समावेश करून प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे क्षेत्रीय अभ्यासाची पुर्तता करण्याचा दृष्टीकोन ठेवला आहे.

Scanned with CamScanner

Rajdhani
DATE / /

# मौजे लोणी गाव निवडण्यापाठी- -मागची कारणे

मौजे लोणी हे गाव सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील वडूज शहराजवळील आहे. लोणी हे गाव महाराष्ट्र राज्यातील पर्जन्य छायेच्या प्रदेशात मोडत असल्याने या ग्रामीण खेड्यात पर्जन्याचे प्रमाण खूपच कमी आहे. त्यामुळे त्याचा परिणाम वसाहतीच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनावर होत आहे. त्यामुळे या वसाहतीमध्ये विविध प्रकारच्या नैसर्गिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक सांस्कृतिक सामाजिक, अशा समस्या निर्माण होतात. त्यापैकी या अवर्षण प्रवण ग्रामीण खेड्यातील शैक्षणिक समस्या व शैक्षणिक विकास, आरोग्यसेवा, लोकसंख्या, गावचा विकास लक्षात घेण्याच्या हेतुने मौजे लोणी या वसाहतीची निवड केली. तसेच हे गाव आमच्या शिक्षण ठिकाणापासुन जवळच असल्याने आणि वाहतुक व्यवस्था असल्याने सर्वांच्या सोयीसाठी आणि अभ्यासक्रम पूर्ततेसाठी मौजे लोणी ता. खटाव जि. सातारा या ग्रामीण खेड्याची निवड केली आहे.

Scanned with CamScanner

# मौजे लोणी गाव निवडण्या-पाठीमागचे उद्देश

1) मौजे लोणी हे गाव वडूज पासुन जवळ आहे.

2) शिक्षण ठिकाणापासुन विद्यार्थ्यांना सर्वेक्षण ठिकाणापर्यंत पोहचता येते.

3) लोणी या गावाला वाहतुक व्यवस्था आहे.

4) अभ्यासक्रमातील ग्राम अभ्यास हा विभाग पूर्ण करण्याच्या हेतुने लोणी या गावाची निवड केली आहे.

5) तसेच मौजे लोणी हे सातारा जिल्ह्यातील, खटाव तालुक्यातील छोटेसे खेडे आहे.

6) मौजे लोणी गावचे कार्यक्षेत्र लहान आहे.

7) मौजे लोणी गावची लोकसंख्या कमी आहे.

Scanned with CamScanner

Rajdhani
DATE / /

# क्षेत्रीय अभ्यासक्रमासाठी वापरण्यात आलेल्या अभ्यास पद्धती

ग्रामसर्वेक्षण पूर्ततेसाठी महाविद्यालयाच्या कार्यक्षेत्रा -पासुन जवळच असलेल्या मौजे लोणी च्या गावची निवड करून या गावाचा सर्वे करण्यासाठी विविध अभ्यासपद्धतींचा अवलंब केला. त्या अभ्यास पद्धती पुढील प्रमाणे.-

1) मुलाखत पद्धती -

मौजे लोणी चा वसाहतीच्या सखोल अभ्यास करण्यासाठी म्हणजेच क्षेत्रीय अभ्यास पुर्ण करण्यासाठी आम्ही मुलाखत अभ्यास पद्धत प्रभावीपणे अवलंबी आहे. अभ्यासक्रम पूर्ततेसाठी आम्ही प्रशासकीय अधिकारी, महसुल अधिकारी, ग्रामपंचायत, सदस्य (सरपंच), उपसरपंच, तलाठी, जि. प. प्रा. धमिक शाळेचे शिक्षक आणि वसाहती मधील नागरीक यांच्या मुलाखती घेवून ग्रामसर्वेक्षण प्रभावीपणे पुर्ण करण्यासाठी शेतकरी ग्रामविकास अधिकारी, छोटे-छोटे दुकानदार व इतर व्यवसाय करणारे लोक इ. च्या मुलाखती घेतल्या व ग्रामसर्वेक्षण पुर्णत्वा कडे नेण्याचा प्रयत्न केला.

2) निरिक्षण पद्धत -

क्षेत्रीय अभ्यासक्रमासाठी निरीक्षण अभ्या -स पद्धती ही एक प्रभावी अभ्यासपद्धती समजली जाते. सर्वेक्षण पूर्ण करण्याकरिता ही अभ्यासपद्धत दोन दिवसाच्या कालखंडात खूप उपयोगी आणि प्रभावी अशी ठरली. निरीक्षणा -तुन वसाहत, वसाहतीच्या विकासावर प्रभाव टाकणारे नैस-र्गिक, अर्थिक, सामाजिक, सांस्कृतीक घटकाचे आकलन झाले.

Scanned with CamScanner

Rajdhani
DATE / /

3) सांख्यिकी माहितीचे संकलन व विश्लेषण पद्धत -

ग्रामअभ्यासासाठी आवश्यक असणारी सांख्यिकी माहिती महसुल विभागातुन ग्रामपंचायतीमधून उपलब्ध केली. तसेच काही माहिती आम्ही ग्रामस्थांच्या मुलाखतीमधुन उपलब्ध केली. विशेषत: भूमी उपयोजनाची आकडेवारी या सांख्यिकी विशेष भर दिला. ही सांख्यिकी माहितीची सुसंगत मांडणी करण्यासाठी आम्ही विविध प्रकारच्या आलेख व आकृत्यांच्या अवलंब केला आहे.

# लोणी वसाहतीचे भौगोलिक स्थान -

ग्रामसर्वेक्षण अभ्यास पूर्ततेसाठी आणि क्षेत्रीय अभ्यास पूर्ण करण्यासाठी आम्ही महाविद्यालयाच्या कार्यक्षेत्राजवळील मौजे लोणी या गावची निवड केली.

मौजे लोणी हे गाव महाराष्ट्र राज्यातील सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील वडूज या तालुक्याच्या ठिकाणाच्या पश्चिमेला साधारणपणे 16 k.m. अंतरावर आढळून येते. ही वसाहत समुद्र-सपाटीच्या पूर्वेकडे निर्माण झालेल्या पर्जन्य छायेच्या प्रदेशातील वसाहत असुन या वसाहतीची समुद्रसपाटीपासुन उंची 737 m. आहे. या वसाहतीचे एकुण क्षेत्रफळ 1780.23 हेक्टर असुन या गावची लोकसंख्या 2011 जनगणनेनुसार 1479 एवढी असुन त्यापैकी 759 पुरुष व 720 स्त्रीयांची संख्या आहे. तसेच 1350 हेक्टर शेतजमीनीपैकी पडीक जमीन 450 हेक्टर, 300, हेक्टर बागायत तर 510 हेक्टर जिराईत क्षेत्र आहे. यावरती अन्नधान्य पिके, नगदी पिके, कडधान्य पिके व इतर पिके प्रामुख्याने घेतली जातात. या वसाहतीचे भौगोलीक स्थान पुढीलप्रमाणे -

1) सापेक्ष स्थान -

मौजे लोणी हे महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील पर्जन्य छायेच्या प्रदेशातील खटाव तालुक्यातील वडूज या तालुक्याच्या ठिकाणाच्या पश्चिमेस 16 km. अंतरावरती वसले असुन या गावच्या पुर्वेस कुरोली, उत्तरेस खटाव, दक्षिणेस वरूड तर पश्चिमेस भोसरे या गावच्या सिमा आढळून येतात. तसेच लोणीगावच्या सभोवताली उंच सखल भाग, डोंगर आढळून येतो. या वसाहतीची स-समुद्रसपाटीपासुनची उंची 737 मी. आहे.

2) निरपेक्ष स्थान - मौजे लोणी या गावचे निरपेक्ष स्थान खालीलप्रमाणे-

1) अक्षवृत्तीय विस्तार - 17° 30' उत्तर अक्षवृत्त 2) रेखावृत्त विस्तार - 74° 30' पूर्व रेखावृत्त

Rajdhani
DATE / /

# लोणी गावची ऐतिहासिक पा-
# -र्श्वभूमी

लोणी गावच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेत असताना या गावच्या निर्मितीला शिवकालीन वारसा लाभलेला दिसतो. या गावच्या स्थापनेच्या पार्श्वभूमीविषयी गावातील वृद्ध लोकांच्या बरोबर चर्चा केल्यानंतर काही पार्श्वभूमी आमच्यापुढे मांडण्या-त आली. लोणी या गावाला लोणी भोसरे या नावाने ओळखले जाते. भोसरे हे गाव ऐतिहासिक असुन शिवाजी महाराजांचे मंत्रीमंडळातील सरसेनापती प्रतापराव गुजर हे या गावचे सुपुत्र होते. यामुळे लोणी गावाला सुद्धा ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले आहे. मुघलशाहीच्या काळात काही सैन्य याठिकाणी येवून स्थायीक झाले. कालांतराने व्यापाराच्या उद्देशाने उत्तर भारतातुन आर्य समाजातील लोक या ठिकाणी आले. गावामध्ये असणाऱ्या मराठी समाजातील काही लोकांनी प्रथम या गावात वस्ती करून राहण्यास सुरुवात केली. या गावची रचना पारंपारिक स्वरूपाची आहे. तसेच या गावात आजही काही प्रमाणात बारा बलुतेदार या पद्धतीची समाजरचना नसल्याचे दिसुन येते.

लोणी गावाच्या उत्तरेला लोणहिरा नावाचा ओढा असल्यामुळे या गावाला 'लोणी' हे नाव प्रसिद्धीस आले. आणि या लोणहिरा ओढ्यावर ब्रिटिशकालीन पुल अजुनही अस्तित्वात आहेत.

या गावामध्ये ऐतिहासिक दिवाणवाडा होता.

या गावात पुर्वीच्याकाळी पाटीलकी अस्तित्वात होती.

1955 साली मौजे लोणी या गावात ग्रामपंचातीची स्थापना झाली. या ग्रामपंचायतीची एकुण सदस्य संख्या 7 आहे. या गावात या गावात ग्रामपंचायतीची अंतर्गत सांडपाणी व्यवस्था, जलस्वराज्य पाणी योजना यासारख्या योजना राबविण्यात आल्या आहेत. ग्रामपंचायतीचा प्रशासकीय कारभार हा संगणकीकृत आहे.

मौजे लोणी या गावातील ग्रामसभा, वर्षातुन तीन वेळा भरते. ही ग्रामसभा प्रामुख्याने 15 ऑगस्ट, 26 जाने व 1 मे तीन दिवशी भरते.

Rajdhani
DATE / /

# लोणी वसाहतीची वैशिष्ट्ये

1) आजही लोणी गावामध्ये बलुतेदार पद्धत अस्तित्वात नाही.

2) या लोणी गावात पाणी फांऊडेशनचे काम पुर्ण झाल्यामुळे लोणी गावच्या मोठ्या प्रमाणे विकास झालेला आढळून येत आहे.

3) लोणी या गावचा पाणी फांऊडेशनमध्ये जिल्ह्यात प्रथम क्रमांक आला आहे.

4) विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयाची स्थापना केली आहे.

5) लोणी गाव शहामृगांसाठी प्रसिद्ध आहे. येथे भरपूर पर्यटक भेटी देण्यासाठी येतात.

6) लोणी या गावात P.S.I, वकील, डॉक्टर, पोलिस, मिलीटरीत व MPSC परीक्षा उत्तीर्ण होऊन मोठ - मोठ्या पदांवरती भरती झालेली आहेत. गाव लहान असून या ठिकाणी चांगल्या पोस्टवर मुले आहेत. हेच वैशिष्ट्य या गावचे मोठे आहे.

7) गणेश उत्सवामध्ये लोणी गावाला एक गाव एक गणपती म्हणुन व सगळे लोक एकत्रीत येऊन उत्सव साजरा करतात. यासाठी लोणी गावला पुरस्कार प्राप्त झाला आहे.

Scanned with CamScanner

Rajdhani
DATE / /

# मौजे लोणी गाव वसाहतीच्या विकासावर परिणाम करणारे घटक

प्रस्तावना-

कोणत्याही प्रदेशात जेव्हा एखाद्या वसाहतीची स्थापना किंवा विकास होत असतो. तेव्हा त्या वसाहतीच्या स्थापनेवर आणि विकासावर त्या प्रदेशातील नैसर्गिक घटकांचा परिणाम मोठ्या प्रमाणात पडत असतो. शिवाय त्या वसाहतीच्या विकासा-वर त्या प्रदेशातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक घटकांचा देखील मोठा प्रभाव पडत असतो.

अ) नैसर्गिक घटक-

मौजे लोणी ही वसाहत सातारा जिल्ह्यातील उत्तरेकडे अवर्षणप्रवण असलेल्या खटाव तालुक्यातील वडूज या ठिकाणापासुन पुर्वेला 16 K.m अंतरावरती आढळून येते. अवर्षणप्रवण किंवा पर्जन्य छायेच्या प्रदेशात या वसाहतीचे स्थान आढळून येत असल्याने या वसाहतीच्या विकासावर नैसर्गिक घटकांचा विशेष जमिन, जलप्रणाली, वनस्पती इ. घटकांवर प्रभाव आढळून येतो.

1) भुपृष्ठ रचना-

मौजे लोणी ही महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्या-तील खटाव तालुक्यात डोंगरांच्या सानिध्यात वसलेले आहे. या वसाहतीची भुपृष्ठ रचना ही घाटमाथ्यावरती झालेली आहे. त्यामुळे या प्रदेशातील भूपृष्ठरचना ही अतिशय कठीण सछिद्र खडकापासुन निर्माण झाली आहे. त्या ठिकाणाची भुपृष्ठ रचना शेती उपयुक्त अशा प्रकारची निर्माण झाली आहे.

Scanned with CamScanner

Rajdhani
DATE / /

2) हवामान -

वसाहत कोणतीही असली तरी त्या वसाहतीच्या स्थापनेवर आणि विकासावर हवामान हा प्रभाव टाकणारा मोठा घटक आहे. पर्जन्य छायेचा प्रदेश असल्याने या प्रदेशात पर्जन्याचे खूप कमी प्रमाण आढळते. या प्रदेशामध्ये साधारणपणे सरासरी 50 c.m. पेक्षा ही कमी पर्जन्य आढळते. त्यामुळे या प्रदेशातील हवामान उष्ण- कोरडे अशा प्रकारचे आढळते. तसेच या वसाहतीमधील शेतीचा विकास हा पूर्णपणे मान्सुनवर व उन्हाळ्यात पडणाऱ्या वळीव पावसावर अवलंबुन असतो.

3) जलप्रणाली -

मौजे लोणी वसाहतीत जलप्रणालीचा विकास मोठ्या प्रमाणात झालेला आहे. या वसाहतीमध्ये दोन महत्वाचे ओढे विकसित झाले आहेत. तसेच ~~या वसाहतीच्या पुर्वेला~~ वेंदचा ओढा तर उत्तरेला गाव ओढा आहे. हे दोन्ही ओढे एकत्र येऊन घेरवा नदीला मिळतात. वसाहतीच्या हद्दीत या दोन्ही ओढ्यांचा प्रवास साधारणपणे 15 ते 16 km. आहे. या व्यतिरिक्त ठिकठिकाणी पाझर, तलाव, विहीर, कुपनलिका, आढळून येतात. तसेच या वसाहतीत एकुण 6 बंधारे आहेत. अशा प्रकारे ही सर्व वसाहतीमधील पाणी पुरवठ्याची साधने आहेत.

4) नैसर्गीक वनस्पती -

पर्जन्य छायेच्या प्रदेशात या वसाहतीचा विकास झाल्यामुळे वसाहतीत आढळून येणाऱ्या वनस्पती या पर्जन्य छायेच्या प्रदेशातील पानझडी वनस्पती आढळून येतात. पर्जन्याचे प्रमाण खूप कमी झाल्यामुळे या प्रदेशातील वनस्पतींची विशेष वैशिष्ट्ये आढळून येतात. या वसाहतीच्या परिसरामध्ये प्रामुख्याने बाभळ, चिंच, आंबा, खैर, लिंब, तरवड, जांभळ, पिंपरन पिंपळ, निवडुंग, करंज इ. वनस्पती आढळून येतात. याशिवाय अलिकडच्या काळात शेतीमध्ये झालेला विकास या कारणांमुळे

Scanned with CamScanner

आंबा, डांळिंब, सिताफळ, द्राक्षे या सारख्या फळबागांच्या विकास विकास केलेला आढळून येतो. परंतु यासाठी सिंचनाचे आधुनिक तंत्र ठिबक किंवा तुषार सिंचन याचा वापर केलेला आढळून येतो.

ब) आर्थिक घटक –

मौजे लोणी ही वसाहत ग्रामीण असल्यामुळे वसाहतीच्या विकासावर अर्थिक घटकांच्या फारसा प्रभाव आढळून येत नाही. तरीही शेती हा या वसाहतीचा प्रमुख व्यवसाय असुन उदरनिर्वाहाच्या हेतुने अन्न-धान्याची शेती प्रामुख्याने केली जाते. शिवाय अलिकडे पैशाची पिकेही काही प्रमाणात घेतली जातात. जवळ-जवळ 80%. पेक्षा जास्त लोक शेती या प्राथमिक व्यवसायात गुंतलेले आहेत. आणि इतर लोक नोकरी, दुकानदारी मजुर या सारख्या व्यवसायामध्ये गुंतलेले दिसुन येतात.

1) शेती:-

लोणी या वसाहतीच्या विकासावर अर्थिकदृष्टया परिणाम करणारा शेती हा एकमेव एक प्रभावी व परिणामकारक असा घटक आहे. वसाहतीमधील 80%. पेक्षा जास्त लोक या व्यवसायाशी निगडीत असुन शेती अनुकुल मृदेची उपलब्धता असल्यामुळेच या व्यवसायाच्या विकास झालेला आढळून येतो. पाणीपुरवठा हा कमी प्रमाणात असल्यामुळे हंगामी बागायत शेती प्रकार आढळून येतो. खरीप, रब्बी, अशी पिके शेतीतुन घेतली जातात. त्याचबरोबर या ठिकाणी वर्षभर विहिरीद्वारे व कुपनलिकेद्वारे मुबलक पाणी पुरवठा होतो. तसेच नगदी पिके ही घेतली जातात. खरीप पिकामध्ये बाजरी हे प्रमुख पिक असुन या शिवाय नगदी पिकामध्ये बटाटा, कांदा, टोमॅटो, वाटाणा, ऊस, इ. पिके घेतली जातात. तर रब्बी पिकात ज्वारी, गहू हरभरा, मका ही प्रमुख पिके असुन त्याचे उत्पादन चांगल्या

Scanned with CamScanner

Rajdhani
DATE / /

प्रकारे घेतले जाते. यापैकी ज्वारी हे प्रमुख पिक असुन त्याचेच उत्पादन सर्वात अधिक घेतले जाते. त्याचबरोबर शेती-पुरक पशुपालनाच्या देखील विकास झाला असुन दुध-उत्पादनाच्या दृष्टीने शेतीवर आधारित पाळीव प्राण्यांची जोपासना केली जाते. यामध्ये गाय, म्हैस, बैल, शेळ्या मेंढ्या, कोंबड्या, यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

२) उद्योगधंदे / दुकानदारी :-

मौजे लोणी ही वसाहत एक ग्रामीण शेती खेडे म्हणुन उदयास येऊन विकसित झाली आहे. त्यामुळे या वसाहतीचा प्रमुख आणि आर्थिक दृष्टीकोनातुन शेती हा प्राथमिक व्यवसाय खूप महत्वाचा आहे. तसेच दुध- दुभते किंवा इतर काही पदार्थ मिळवण्याच्या हेतुने शेतीवर आधारित पशुपालन सारखा व्यवसाय केला जातो. अलिकडे दुधाची वाढती मागणी लक्षात घेऊन किंवा ग्रामीण भागात दुग्ध व्यवसायाच्या झालेला विकास लक्षात घेऊन गावातील लोकांनी मोठ्या प्रमाणात गाईचेसंगोपन करुन दुग्ध व्यवसायाला चालना दिली आहे. या वसाहतीमध्ये दोन दुध डेअरी आहेत. यामध्ये शहाजी जगताप आणि राजेंद्र हरीभाव फडतरे यांच्या डेअऱ्या आहेत. प्रतिदिन 1000 लि. दुध या वसाहतीमधुन दुध डेअरीला जाते. याशिवाय काही लोक दुकानदारी करताना आढळून येतात. यामध्ये श्री. दिलीप देवकर यांचे किराणामाल दुकान आहे. किराणामाल दुकानांची संख्या 3 असुन ती श्री दिलिप देवकर, श्री प्रितम थोरात, श्री गजानन चिंचकर यांची आहेत. अलिकडे आधुनिक पिठांच्या गिरण्या आढळून येत आहेत. तसेच एकुण लोकसंख्येपैकी 2% लोक विशेषतः तरुण वर्ग रोजगाराच्या हेतुने मुंबई, पुणे, अशा महानगरांकडे स्थलांतरित झालेले आहेत. यामध्ये प्रामुख्याने पेंटर, इंजिनिअर, शिक्षक, कंपन्यामध्ये काम करणारा तरुण वर्ग समाविष्ट आहे.

3) वाहतुक व दळणवळण –

मौजे लोणी च्या वसाहतीमध्ये आधुनिक वसाहतीच्या साधनाच्या चार चाकी व दुचाकी साधनांचा विकास झालेला आढळतो. त्यामुळे वाहतुकीची साधने ही वाहतुकीच्या दृष्टीने चांगली उपयोगी ठरतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे एस. टी. महामंडळाची बस दिवसातुन इतेढ फेऱ्या दोन-दोन तासाला पूर्ण करत असते. शिवाय इतर वाहतुकीच्या साधनामध्ये 200 च्या आसपास बाईक व 60 च्या आसपास सायकल तर 15 ते 20 च्या आसपास चारचाकी साधनांचा म्हणजेच बैलगाडीचा वापर देखील वसाहती अंतर्गत केला जातो. वाहतुकीच्या साधनाबरोबर दळण-वळण साधनांचा देखील चांगला विकास झाला असुन वसाहतीमधील प्रत्येक घरात भ्रमणध्वनी उपलब्ध आहे. शिवाय 75% पेक्षा जास्त घरांमध्ये रंगीत टेलीव्हिजन संच आढळून येतात. केबल नेटवर्कची उपलब्धता असल्यामुळे वसाहतीमध्ये मनोरंजनाचा चांगलाच विकास झालेला आहे.

4) आरोग्य सेवा –

वसाहतीमध्ये आरोग्य सेवा फारश्या विकसित झालेल्या नाहीत. ही एक वसाहतीची प्रमुख समस्या आहे. वसाहतीमध्ये एक खाजगी आरोग्य सेवा केंद्र आहे. डॉ. रामचंद्र शिंदे यांचे आरोग्य सेवा केंद्र आहे. तसेच कुरोली, वडूज हे तालुक्याचे ठिकाण जवळ असल्याने त्याचाही फायदा लोकांना होतो. तसेच मौजे लोणी ग्रामपंचायत लोणी यांना ही लोकांचे आरोग्य लक्षात घेऊन गावात स्वच्छता राहावी या उद्देशाने अंतर्गत रस्ते व रस्त्याच्या बाजुला गटारे सिमेंट क्रॉक्रिटने बांधलेली आहेत. त्याचा चांगला परिणाम हा आरोग्यावरती होतो.

क) धार्मिक / सामाजिक / सांस्कृतिक घटक –

वसाहतीच्या विकासावर

Scanned with CamScanner

Rajdhani
DATE / /

धार्मिक, सामाजिक, व सांस्कृतीक घटकांचा देखील प्रभाव आढळून येतो. वसाहतीमध्ये वर्षभर विविध प्रकारचे सण, पुण्यतिथी जयंत्यांमध्ये एप्रिल महिन्या हनुमानाची आणि खंडोबाची, जोतिबा-ची यात्रा भरवली जाते. ह्या यात्रा वसाहतीमधील सर्व गावकरी व सामाजिक सांस्कृतिक, मंडळे, एकत्रित साजरे करतात यात्रे निमित्त बैलगाड्यांची शर्यत, कुस्त्या, ऑर्केस्ट्रा इ. चा समावेश होतो. वसाहतीमध्ये एकुण 4 मोठी मंदिरे आहेत. त्यामध्ये गणपती, जोतिबा, खंडोबा, शंकराचे मंदिरे आहेत. यात्रेच्या वेळेस कीर्तन, प्रवचन, ज्ञानेश्वरी पारायण हे कार्यक्रम असतात. तसेच मौजे लोणी वसाहतीत लग्न कार्याच्या वेळेस वीर निघतो. वसाहतीमध्ये शैक्षणिक व वैद्यकिय सुविधा उपलब्ध आहेत. प्राथमिक शाळा असुन या शाळेत एकुण 37 विद्यार्थी आहेत. तर वैद्यकीय सुविधा म्हणुन डॉ. रामचंद्र शिंदे वेळोवेळी भेट देतात. पुढील वैद्यकीय सुविधेसाठी वडूज, कुरोली, यावर अवलंबुन राहावे लागते.

Scanned with CamScanner

Rajdhani
DATE / /

# मौजे लोणी गावच्या वसाहतीची कार्ये

प्रस्तावना -

मौजे लोणी ही वसाहत सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील वडूज या तालुक्याच्या ठिकाणापासुन 16 K.m. अंतरा-वरती. आढळून येते. या वसाहतीत शेती हे कार्य अतिशय प्रभावी असुन या शिवाय पशुपालन, दुकानदारी, व्यवसाय, धार्मिक, व सांस्कृतीक कार्ये चालते. त्याचा थोडक्यात वृत्तांत पुढीलप्रमाणे -

1) शेती -

मौजे. लोणी या वसाहतीचे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन शेती आहे. वसाहतीमधील 80%. पेक्षा जास्त लोक या व्यवसायाशी निगडीत आहेत. पाणीपुरवठा हा खुप कमी प्रमाणात असल्यामुळे हंगामी बागायत शेती प्रकार आढळून येतो. खरीप व रब्बी आधुनिक शेती तंत्राद्वारे उत्पादन घेतले जाते. वसाहतीमधील शेतीप्रकार पूर्णपणे निसर्गाचे नियंत्रण असुन निसर्गावर आधारित शेतीचा विकास झालेला आढळतो.

2) दुकानदारी -

मौजे लोणी वसाहतीमध्ये शेती हे प्रमुख कार्य असले तरी वारंवार निर्माण होणाऱ्या अवर्षणाचा परिणाम शेती व्यवसायावर झाल्यामुळे बहुतेक लोक इतर व्यवसायात गुंतलेले दिसुन येतात. यामध्ये दुकानदारी हा व्यवसाय बऱ्याच लोकांनी स्वीकारला आहे. यामध्ये श्री. दिलीप देवकर, श्री, प्रितम थोरात श्री. गजानन. चिंचकर यांची आहेत.

Scanned with CamScanner

Rajdhani
DATE / /

3) धार्मिक व सांस्कृतिक कार्ये :-
मौजे लोणी या वसाहतीवर धार्मिक व सांस्कृतिचा विशेष प्रभाव झालेला आढळून येतो. गावात वर्षभर विविध प्रकारचे सण, पुण्यतिथी, जयंत्या व राष्ट्रीय सण साजरे केले जातात. तसेच या वसाहतीमध्ये एप्रिलमध्ये हनुमान जयंती आणि खंडोबा यात्रा भरवल्या जातात. एवढेच नव्हे तर गणेश उत्सव हा सण मोठ्या उत्साहाने साजरा करून वसाहतीमधील ऐक्य प्रदर्शित केले जाते.

4) प्रशासकीय कार्ये -
मौजे लोणी गावचा कारभार प्रशासकीय माध्यमातुन चालविला जातो. हे प्रशासनाचे काम ग्रामपंचायतीच्या माध्यमातुन केले जाते. रस्ते, गटारे, यांची दुरुस्ती केली जाते. अनेक योजना ग्रामपंचायतीद्वारे राबविल्या जातात. मागासवर्गीय लोकांसाठी अनुदान दिले जाते. समाजकल्याण विभागातर्फे घरकुल, तसेच महिला व बालकल्याण या योजनेतुन गावचा विकास साधला जातो. उरवरीत प्रशासकीय कामकाजासाठी वसाहती मधील लोकांना वडूज या तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते. ग्रामपंचायतीच्या माध्यमातुन जलस्वराज्य यासारख्या योजना राबविल्या जातात.

5) करमणुक कार्ये :-
मौजे लोणी वसाहतीमध्ये करमणुकीचे कार्ये चांगल्या प्रकारे विकसित झाले आहे. या वसाहतीमध्ये 75% पेक्षा जास्त घरामध्ये रंगीत टेलीव्हिजनचे संच आढळून येतात. केवळ नेटवर्कची उपलब्धता असल्यामुळे वसाहतीमध्ये मानोरंजनाचा चांगल्या प्रकारे विकास झाला आहे.

6) आरोग्य सुविधा
मौजे लोणी वसाहतीमध्ये आरोग्य सेवा

Scanned with CamScanner

Rajdhani
DATE / /

फारशा विकसित झाल्या नाहीत. तरी सुद्धा डॉ. रामचंद्र शिंदे हे वसाहतीला भेट देतात. त्याचा एक छोटासा खाजगी दवाखाना आहे. तसेच पशु आरोग्याच्या दृष्टीने डॉ. इंजार आणि डॉ. अशोक पुणेकर यांचे खाजगी दवाखाने येथे आहेत.

7) शैक्षणिक कार्ये-


मौजे लोणी वसाहतीमधील शैक्षणिक कार्ये हे चांगल्या प्रकारे विकसित झाले असुन उच्च शिक्षणासाठी कुरोली, औंध, वडूज, व इतरत्र स्थलांतर करावे लागते.

8) इतर कार्ये-

वरील कार्यांच्या व्यतिरिक्त मौजे लोणी वसाहती-मधील पोस्ट ऑफिसच्या माध्यमातुन सेवा पुरविली जाते. तसेच लोकांना संदेश वहन करता यावे म्हणुन आणि दळण-वळणाच्या सुविधांचा चांगल्या प्रकारे विकास झालेला आढळून येतो. तसेच या वसाहतीमध्ये सार्वजनिक ग्रंथालय आहे. या वसाहती मधील डॉक्टर, शिक्षण, PSI, वकिल, पोलिस, मिलिटरी, भरती झालेली आहेत. मौजे लोणी या वसाहतीमध्ये व्यायाम शाळा आणि तालिम देखील आहे.

Scanned with CamScanner

# वसाहतीची अंतर्गत रचना (कच्चा आराखडा)



# लोणी गावचे भूमी-उपयोजन

प्रस्तावना-

जमिन ही एक नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. जमिनीवर अरण्य, कुरणे, जलाशये इ. घटक आहेत. म्हणजेच निसर्गाद्वारे जमिनीचा उपयोग केला जातो. तर मानवाद्वारे जमिनीच्या उपयोग वसाहत शेती, धरणे, कालवे, उद्योग, कारखाने विद्युत ग्रहे वाहतुक मार्ग इ. थोडक्यात जमिनीचा निरनिराळ्या उद्देशाने होणारा वापर यास भूमि उपयोजन म्हणतात.

1) भूमी उपयोजनाची संकल्पना-

शेती हा मानवाच्या प्राथमिक व्यवसाय जमिनीवर अवलंबुन आहे. जमिन ही नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. या भूमिचा वेगवेगळ्या कारणासाठी उपयोग केला जातो. या जमिनीच्या निरनिराळ्या उद्देशाने होणाऱ्या वापरास भूमी उपयोजन म्हणतात.

इ. स 1783 साली जे. एच व्हॉन थ्युनेन या जर्मन शास्त्रज्ञाने स्वतः शेती करून भूमी उपयोजनाचा सिद्धांत मांडला.

2) कृषी भूमी उपयोजनावर परिणाम करणारे घटक-

अ) नैसर्गिक घटक-


मौजे लोणी ही वसाहत पर्जन्य छायेच्या प्रदेशात आढळून येत असल्यामुळे या वसाहतीच्या कृषीभूमी उपयोजनावर नैसर्गिक घटकांचा विशेष प्रभाव आढळून येतो. या घटकांमध्ये भूपृष्ठ रचना, हवामान, जलप्रणाली इ. घटकांचा प्रभाव होतो. शेतीचा विकास हा पूर्णपणे पावसावर अवलंबुन असतो. कमी पर्जन्याचा परिणाम हा भूमी उपयोजनावर

Scanned with CamScanner

परिणाम होतो.

ब) सामाजिक / आर्थिक घटक-

भूमी उपयोजनावर परिणाम करणारा शेती हा सर्वात जास्त प्रभावी आर्थिक घटक आहे. मृदा अनुकूल असल्यास शेतीच्या विकास होतो. परंतु प्रतिकूल मृदेमुळे भूमी उपयोजनावर परिणाम होतो. मृदेवरच अवलंबुन विविध प्रकारची पिके घेतली जातात. शेतीला अनुसरून विविध प्रकारचे जोडधंदा म्हणुन व्यवसाय केले जातात. उदा. पशुपालन दुध, अंडी, तसेच जमिनीच्या अनुकुलतेमुळे दळणवळण साधनांचा वाहतुकीचा विकास होतो.




- मौजे लोणी गावचे भूमी उपयोजन क्षेत्र (हेक्टरमध्ये)

मौजे लोणी गावचे भूमी उपयोजन लक्षात घेतले असता पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

| अ.क्र. | तपशिल | क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|
| 1) | शेती योग्य पिकाखालील | 1576 |
| 2) | लागवडी योग्य | 360 |
| 3) | लागवडी अयोग्य | 504 |
| | अ) खराब | – |
| | ब) ओढे -नाले - ओघळ | 24.70 |
| 4) | गावरान | 113.79 |
| 5) | गावठाण | 6.88 |
| 6) | स्मशान भूमी वरस्ते | 0.58 |

Scanned with CamScanner

Rajdhani
DATE / /

1) जमिनीचा सर्वसाधारण उपयोग-

लोणी गावच्या जमिनीचा सर्वसाधारण वापर हा विभाजित वर्तुळाच्या साहाय्याने दाखवला असता भूमी उपयोजनाचा तुलनात्मक वापर लक्षात होणे खूप सोईस्कर जाते.

2) पिकाखाली जमिनीचा वापर / उपयोग-

लोणी गावचे एकूण क्षेत्रफळ हे सर्वात जास्त वापर हा शेतीसाठी किंवा पिकाखाली आढळून येतो. अन्न-धान्य पिकांसाठी जमिनीचा सर्वात जास्त वापर केला जातो.

3) अन्न-धान्य पिके-

लोणी गावचा शेती हा प्रमुख प्राथमिक व्यवसाय असुन 80% पेक्षा अधिक लोक शेतीमध्ये गुंतलेले आढळून येतात. शेतीमधुन प्रामुख्याने अन्न-धान्य उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. ज्वारी हे प्रमुख पिक असुन त्याचबरोबर गहू, बाजरी, मका या पिकांचे उत्पादन घेतले जाते. नगदी पिकांमध्ये बटाटा हे पीक जास्त घेतले जाते. कडधान्यात मुग, घेवडा, मटकी उडीद, तेलबिया इ. चा समावेश होतो.

Scanned with CamScanner

Rajdhani
DATE / /

# पिक निहाय लागवडीखालील क्षेत्राचे भूमी उपयोजन-

| अ. नु | पिके |
|---|---|
| 1) | ज्वारी |
| 2) | गहू |
| 3) | मका |
| 4) | बाजरी |
| 5) | बटाटा |
| 6) | ऊस |
| 7) | कांदा |
| 8) | वाटाणा |
| 9) | कडधान्य व तेल |
| 10) | इतर पिके |

1) ज्वारी-

लोणी गावच्या शेतीमधील ज्वारी हे प्रमुख अन्नधान्याचे पिक असुन या पिकासाठी आवश्यक भौगोलिक परिस्थिती खूपच अनुकुल आहे. त्यामुळे या पिकाखालील क्षेत्र सर्वात जास्त आहे. या पिकाच्या अनेक संक्रमीत जाती बियाणासाठी वापरल्या जातात. तसेच पारंपारिक बियाणाचा सुद्धा वापर केला जातो.

2) गहू -

हे दुसरे अन्न-धान्याचे पिक असुन खरीप हंगामात घेतले जाते. ज्वारीनंतर या पिकाचे क्षेत्र आढळते. त्यामुळे गहू हे पिके मोठ्या प्रमाणात घेतले जाते.

3) बाजरी-

बाजरी हे तिसरे प्रमुख अन्न-धान्याचे पिक असुन रब्बी हंगामात घेतले जाते. वरील अन्न-धान्य शेतीसाठी विहिर हे एकमेव जलसिंचनाचे स्त्रोत असुन गावात जवळपास 150 ते 200 विहिरींची संख्या आहे.

4) नगदी पिके-

नगदी पिकात बटाटे हे प्रमुख पिक असुन


Scanned with CamScanner

Rajdhani
DATE / /

त्याच्याबरोबर ऊस, कांदा, वाटाणा, हे देखील नगदी पिके म्हणुन उत्पादन घेतले जाते.


मौजे लोंढी अंगणवाडी
* वर्ग निहाय विद्यार्थी संख्या-

| अंगणवाडी क्र. | मुले | मुली | एकुण- |
|---|---|---|---|
| 132 | 7 | 8 | 15 |
| नवीन आहे. | 5 | 11 | 16 |



मौजे लोणी प्राथमिक शाळा
वर्ग निहाय विद्यार्थी संख्या-

| वर्ग | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| पहिली | 7 | 4 | 11 |
| दुसरी | 4 | 5 | 9 |
| तिसरी | 5 | 4 | 9 |
| चौथी | 6 | 5 | 11 |



Rajdhani
DATE / /

10) उच्च शिक्षणासाठी देखील त्यांना तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा शैक्षणिक सुविधा उपलब्ध असलेल्या ठिकाणी स्थलांतरीत होतात.

11) शैक्षणिक उपक्रमामध्ये मौजे लोणी ग्रामस्थांचा सहभाग खूप कमी असतो.

Scanned with CamScanner

Rajdhani
DATE / /

# • उपाय योजना •

1) मौजे लोणी वसाहतीमध्ये उपलब्ध असलेल्या शिक्षणाच्या दर्जा सुधारून माध्यमिक शिक्षणाचा विकास करणे आवश्यक आहे.

2) प्राथमिक व माध्यमिक शिक्षणासाठी स्थलांतरित होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्या लक्षात घेऊन त्यांना वसाहतीमध्ये उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सुविधेबाबत आकर्षण निर्माण करावे

3) प्रशासनाने शैक्षणिक कार्यासाठी उपलब्ध करून दिलेली इमारत व मैदान त्यांची निगा व्यवस्थित ठेवून इमारतीमध्ये विद्यार्थ्यांसाठी उत्तम प्रकारची बैठक व्यवस्था विविध प्रकारची क्रिडांगणे व खेळाचे साहित्य उपलब्ध करून देणे.

4) शिक्षकांची संख्या लक्षात घेऊन जास्त व पुरेसे शिक्षक उपलब्ध करण्यासाठी प्रशासनाकडे वारंवार मागणी केली पाहिजे.

5) शासन तर्फे राबविले जाणारे उपक्रम चांगल्याप्रकारे अमलात आणने.

6) शाळेत आधुनिक शैक्षणिक साहित्याचा पुरवठा करणे आवश्यक आहे. उदा. संगणक, शैक्षणिक साहित्य इ.

7) शैक्षणिक उपक्रमामध्ये गावातील सर्व ग्रामस्थांनी सहभागी होणे आवश्यक आहे.

Scanned with CamScanner